पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / 25536712 (OFF)

FAX- 020/25536761 Telegram-'SECBOARD' PUNE

E-MAIL sscboardpune@gmail.com

web site – www.sscboardpune.in

ई-मेलद्वारे / संकेतस्थळावर प्रसिध्द

क्र. पुविमं/शाखा-मूल्यमापन./१०६४
पुणे ४११ ००५.
दिनांक ०५ ऑगस्ट, २०१७

प्रति,

मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, जिल्हा पुणे.

विषय – इ. ११ वी व इ.१२ वी च्या भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित आणि संख्याशास्त्र (कला व विज्ञान) या विषयाच्या सुधारित प्रश्नपत्रिका आराखडयानुसार शिक्षक प्रशिक्षणाबाबत. . .

संदर्भ :- १. रा. मं. पुणे यांचे क्र. रा. मं/ पापुई -७/३६५३ दिनांक १३/०७/२०१७ चे पत्र.
२. रा. मं. पुणे यांचे क्र. रा. मं/ पापुई -७/३९०२ दिनांक २५/०७/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित आणि संख्याशास्त्र (कला व विज्ञान) हया विषयांच्या सुधारित प्रश्नपत्रिका आराखडयाची अंमलबजावणी संदर्भातील विभागस्तरावर जिल्हानिहाय विषय शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये राज्य मंडळाने कळविलेले आहे. तरी यापत्रान्वये या विभागीय मंडळातील कार्यक्षेत्रातील विज्ञान शाखेच्या सर्व कनिष्ठ महाविद्यालयांतील उपरोक्त नमूद प्रत्येक विषयाचा एक विषय शिक्षक याप्रमाणे प्रशिक्षण सोबतच्या तक्त्यानुसार आयोजित करण्यात आलेले आहे.पुणे जिल्हा २ प्रशिक्षण केंद्रे, अहमदनगर १ प्रशिक्षण केंद्र व सोलापूर १ प्रशिक्षण केंद्र राहील. अंदाजे ५० ते ६० प्रशिक्षणार्थींचा एक वर्ग राहील. प्रशिक्षणार्थींना प्रवास भत्ता त्यांचे आस्थापनेवरून घेणेस कळवावे.

| अ.क्र | जिल्हा | विषय व प्रशिक्षणार्थी संख्या (अंदाजे) | | | | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| | दिनांक | ०९/०८/२०१७ | १०/०८/२०१७ | ११/०८/२०१७ | १२/०८/२०१७ | |
| १. | पुणे पूर्व | भौतिकशास्त्र | रसायनशास्त्र | जीवशास्त्र | गणित व संख्याशास्त्र | सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.३० पर्यंत |
| २. | पुणे पश्चिम | भौतिकशास्त्र | रसायनशास्त्र | जीवशास्त्र | गणित व संख्याशास्त्र | |
| ३. | अहमदनगर | रसायनशास्त्र (२६९) | जीवशास्त्र (२६५) | गणित व संख्याशास्त्र (२६४) | भौतिकशास्त्र (२६६) | |
| ४. | सोलापूर | जीवशास्त्र (१७५) | गणित व संख्याशास्त्र (१७४) | भौतिकशास्त्र (१७३) | रसायनशास्त्र (१७६) | |

तरी उपरोक्त तक्त्यानुसार विषय निहाय, जिल्हानिहाय व दिनांक निहाय प्रशिक्षण आराखडा असून त्यानुसार आपण आपल्या स्तरावरून आपल्या विभागातील संबंधित विषय शिकविणा-या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना एक दिवसीय प्रशिक्षणासाठी उपस्थित राहणेबाबत लेखी कळवावे.शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेकडून प्रशिक्षण स्थळाचे ठिकाण निश्चित करून आजच मेलद्वारे प्रशिक्षण केंद्राची माहिती तात्काळ सादर करावी. तसेच प्रशिक्षणाच्या ठिकाणी आवश्यक त्या सोयी, सुविधा (बैठक व्यवस्था, ध्वनी योजना, एलसीडी.प्रोजेक्टर इ.)पुरविणेबाबत संबंधित प्राचार्य यांना कळविण्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना निर्देश देण्यात यावेत.

5/8/2017
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ
पुणे-४११००५

प्रत माहिती स्तव-
१. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे ०४

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-
२. शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, पुणे / अहमदनगर / सोलापूर
३. प्राचार्य, सर्व संबंधित कनिष्ठ महाविद्यालय, पुणे / अहमदनगर / सोलापूर